## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. १३७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/०२/२०१७

**१) ऑफीसचे आलमारीत ठेवलेल्या पैशाची चोरी . :—**

दिनांक २३/०२/२०१७ वा. १५.०० ते १५.३०वा. दर. यातील फिर्यादी राजु हरीभाउ राहांगडाले वय ४४ वर्ष रा. शासकीय वसाहत पालांदुर रोड साकोली कनीष्ठ लीपीक यानी त्याचे वाहन विक्रीचे पैसे २६,०००/—रू. ऑफीसचे आलमारीत ठेवुन ताला न लावता खुली ठेवुन कामा निमीत्त बाहेर गेला असतांना यातील संशयीत आरोपीने कार्यालयात कोणी हजर नसल्याचा सुना मौका पाहुन फिर्यादीचे नगदी २२,०००/—रू. आलमारीतुन चोरून नेल्याने फिर्यादीचे तोडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि शिंदे पोस्टे भंडारा हे करीत आहेत.

**२) अज्ञात वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे, मोटार सायकला घडक दिल्याने चालकाचा मृत्यु . :—**

दिनांक २२/०२/२०१७ चे २०.०० वा. दरम्यान यातील मृतक नेताजी मधुकर भुरे वय अंदाजे २९ वर्ष रा. वलनी हा आपली मोटार सायकल क्रमांक एमएच ३६/९८५० नी वलनी गावावरून मागंली गावी जात असतांना यातील अज्ञात आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मृतकचे मोटार सायकला धडक मारून मृतकचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३०४(अ) भांदवी. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास नापोशि. लांजेवार पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहे.

**३)उसने पैसे मागण्याच्या कारणावरून भांडन करून काठीने मारहान केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०७/०२/२०१७ चे १५.०० वा. दरम्यान यातील आरोपीने जखमी संजय केवल प्रसाद दुबे वय ४६ वर्ष रा. रेल्वे स्टेशन कोका क्वॅटर नं. ०६ यास उसने पैसे मागीतले असता जखमीने पैसे देण्यास नकार दिल्याने यातील आरोपीने भांडन करून काठीने डाव्या हातावर उजवे पायाला मारहान करून फॅक्चर केल्याने डॉक्टरी परीक्षण अहवालावरून फॅक्चर असल्याचे माहीत झाल्याने सरतर्फे सफौ. उईके यांचे चौकशी वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३२५,५०४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**४) सापाने चावा घेतल्याने औषधोपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु . :—**

दिनांक २२/०२/२०१७ चे २०.३० वा. मृतक सौ. शेवंता प्रभुदास वरठे वय ५२ वर्ष रा. डोंगरला हिला दिनांक २२/०२/२०१७ ला सापाने चावा घेतल्याने तीला औषधोपचाराकामी सुबो. दवाखना तुमसर येथे प्रथम उपचार करून पुढील उपचारा करिता सा.रू. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरून पो.स्टे. भंडारा येथे ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्रावरून सरतर्फे पोना चव्हान पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा कळंबे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**५) अती मध प्राषन केल्याने औषधोपचारा इसमाचा मृत्यु . :—**

दिंनाक २३/०२/२०१७ रोजी १९.०० वा. दरम्यान यातील मृतक आशीष युसन मिश्रा वय २८ वर्ष, रा. हलदरपुरी भंडारा यास दिनाक २३/०२/२०१७ रोजी ०९.५५ वा. अती मध प्राषन केल्याने बेशुध्द अवस्थेत सा.रू. भंडारा येथे वार्ड ९ मध्ये भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ.कन्नाके पो.स्टे. भंडारा हे करीत आहे.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक २३/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ८१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०७, त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती १३ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६१ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

सपोनि. के. एम.हत्तीमारे
जि. वि. शा भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९४२२८३२१७८

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.